सहपत्र - A - 3



**(महाराष्ट्र शासनाने वर्षे १९८९ मध्ये स्थापिलेले)**

(Established by Government of Maharashtra in the year 1989)

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)**

ज्ञानगंगा घरोघरी

## विद्वत परिषद बैठक

## सुधारित कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| **बैठक क्रमांक** | : | 63 |
| **स्थळ** | : | व्यवस्थापन मंडळ सभागृह<br>यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ<br>नाशिक, 422222 |
| **दिनांक** | : | मंगळवार, दि. 28 मे 2024 |
| **वेळ** | : | दुपारी 12.00 वाजता |

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
## (महाराष्ट्र शासनाने वर्ष 1989 मध्ये स्थापिलेले)

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या विद्वत परिषद 63 वी बैठक मंगळवार, दि. 28 मे 2024 रोजी दुपारी 12.00 वा. व्यवस्थापन मंडळ सभागृहात आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| 01. प्रा. संजीव सोनवणे, कुलगुरू | अध्यक्ष |
| 02. डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, प्र. कुलगुरू | सदस्य |
| 03.संचालक, मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा | सदस्य |
| 04. संचालक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा | सदस्य |
| 05. संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा | सदस्य |
| 06. संचालक, विज्ञान विद्याशाखा | सदस्य |
| 07. संचालक, कृषी विज्ञान विद्याशाखा | सदस्य |
| 08. संचालक, संगणकशास्त्र विद्याशाखा | सदस्य |
| 09. संचालक, ऑनलाईन लर्निंग विद्याशाखा | सदस्य |
| 10. श्रीमती. शुभांगी पाटील - संचालक, विद्यार्थी सेवा विभाग | सदस्य |
| 11. संचालक, मूल्यमापन विभाग | सदस्य |
| 12. उपग्रंथपाल, ग्रंथपाल व माहितीस्त्रोत केंद्र | सदस्य |
| 13. संचालक, स्कूल ऑफ मल्टीडिसीप्लिनरी स्टडीज | निमंत्रित सदस्य |
| 14. डॉ. लतिका गायकवाड | सदस्य |
| 15. डॉ. दयाराम पवार | सदस्य |
| 16. डॉ. प्रकाश बर्वे | सदस्य |
| 17. श्री. राजेंद्र वाघ | सदस्य |
| 18. डॉ. संजय तांबट - Online | सदस्य |
| 19. संचालक, अंतर्गत गुणवत्ता व आश्वासन कक्ष | सदस्य |
| 20. श्री. भटूप्रसाद पाटील, परीक्षा नियंत्रक | निमंत्रित सदस्य |
| 21. श्री. दिलीप भरड, कुलसचिव | सदस्य सचिव |

**खालील सदस्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.**

| | |
|---|---|
| 01. श्री. विलास विष्णू शिंदे | सदस्य |
| 02. श्री. संजय पांडे | सदस्य |
| 03. डॉ. अजय भामरे | सदस्य |
| 04. संचालक, निरंतर शिक्षण विद्याशाखा | सदस्य |
| 05. संचालक, आरोग्य विज्ञान विद्याशाखा | सदस्य |
| 06. डॉ. राजेंद्र विखे पाटील | सदस्य |

07. श्री. धनंजय बेळे — सदस्य
08. श्री. महेश दाबक — सदस्य
09. डॉ. संजय चाकणे — सदस्य
10. श्री. संजय राजाराम वझे — सदस्य
11. श्री. मधुकर गवळी — सदस्य

| विषय क्रमांक | | तपशील |
|---|---|---|
| 63.1.0 | | स्वागत |
| 63.2.0 | 63.2.1 | **दि. 19 डिसेंबर 2023 रोजी झालेल्या 62 व्या विद्वत परिषदेच्या बैठकीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.**<br>**ठराव** – 62 व्या विद्वत परिषदेच्या बैठकीचे कार्यवृत्त वाचून सर्वानुमते संमत करण्यात आले. |
| | 63.2.2 | **दि. 19 डिसेंबर 2023 रोजी झालेल्या 62 व्या विद्वत परिषदेच्या बैठकीतील निर्णयावरील कार्यवाहीचा अहवाल**<br>**ठराव** - 62व्या विद्वत परिषदेच्या बैठकीतील निर्णयावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मान्य करण्यात आला. |
| 63.3.0 | | **सखोल चर्चेचे विषय** |
| | | सखोल चर्चेच्या विषयांवर चर्चा होण्यापूर्वी मा. कुलगुरुंनी पुढीलप्रमाणे सुचना केल्या व त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली : -<br>1. विद्वत परिषदेपुढे जे विषय विचारार्थ, निर्णयास्तव येण्यापूर्वी इतर संबंधित प्राधिकरणांची पूर्वमान्यता घेणे आवश्यक असते. त्याबाबतीत संबंधित प्राधिकरणास विद्वत परिषदेत घेतलेल्या विषयांचे निर्णय अवगत करण्यासाठी सादर करावे.<br>2. विद्वत परिषदेत घेतलेल्या धोरणात्मक विषयांवर नियोजन मंडळात चर्चा होऊन निर्णय घेतले आहेत असे निर्णय विद्यापीठाच्या कायदा, परिनियम तसेच अध्यादेशानुसार झालेले असतात. अशी दुरुस्ती झाल्यानंतर सर्व संबंधितांच्या माहितीसाठी / कार्यवाहीसाठी परिपत्रकाद्वारे प्रसिद्ध देण्यात यावी.<br>3. विद्यापीठाची विद्वत परिषद आवश्यकतेनुसार विद्याशाखा परिषदेच्या शिफारशीनुसार नवीन शिक्षणक्रम, अभ्यासक्रम विविध प्रमाणपत्र, पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी स्तरावरील अभ्यासक्रमांना मान्यता देते व त्यानुसार अशा पदव्या प्रस्थापित करून (institute करणे) प्रदान करण्यात येतात. तथापि अशी प्रक्रिया राबविण्यात येत नाही असे दिसून येते. अशी प्रक्रिया इथून पुढे राबविण्यात यावी.<br>नियोजन मंडळ, विद्वत परिषद यांच्या बैठकांचे वर्षभराचे नियोजन करून अधिनियमानुसार किमान बैठका घेण्यात याव्यात. |
| | | **ठराव** – मा. कुलगुरुंनी मांडलेल्या सुचनांना सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| **स्कूल ऑफ ऑनलाईन लर्निंग** | 63.3.1 | **दि. 04 एप्रिल 2024 रोजी आयोजित ऑनलाईन लर्निंगची विद्याशाखा परिषद क्र. 01 चे इतिवृत्त मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** - दि. 04 एप्रिल 2024 रोजी आयोजित ऑफ ऑनलाईन लर्निंगची विद्याशाखा परिषद क्र. ०१ चे इतिवृत्त विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर... |
| | | **ठराव** – सदर विषयाबाबत विद्याशाखेच्या संचालकांनी विद्याशाखा परिषदेच्या महत्वाच्या बाबींवर विश्लेषण केले. त्यानुसार दि. 04 एप्रिल 2024 रोजीच्या ऑनलाईन लर्निंगच्या विद्याशाखा परिषदेच्या इतिवृत्तास विद्वत परिषदेने सर्वानुमते मान्यता दिली.<br>सदरचा ठराव याच सभेत वाचून याच सभेत कायम करण्यात आला. |

| | | |
|---|---|---|
| | 63.3.2 | **निरंक.**<br>विषयपत्रिका तयार करताना 63.3.2 हा अनुक्रमांक **कोणत्याही विषयाला दिला गेला नव्हता.** सबब हा अनुक्रमांक निरंक आहे. |
| | 63.3.3<br>**परीक्षा विभाग** | **गायकवाड स्वप्निल मनोहर (का.नों.क्र. 2016017001352885) या विद्यार्थ्यांची बी.ए. पदवी रद्द करणेबाबतचा प्रस्ताव कार्योत्तर मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** – गायकवाड स्वप्निल मनोहर (का.नों.क्र. 2016017001352885) या विद्यार्थ्याने विद्यापीठात बी.ए. शिक्षणक्रमासाठी प्रवेश घेऊन उत्तीर्ण झालेला आहे. त्याचबरोबर मॉडर्न कॉलेज, पुणे येथे नियमित अभ्यासक्रमाची बी.एस्सी. पदवी पूर्ण केलेली असल्याने त्यांच्या दि. 28.8.2023च्या विनंती अर्जानुसार आपल्या विद्यापीठाची बी.ए. पदवी रद्द करण्याची विनंती केली होती. त्यास परीक्षा मंडळाच्या 46 च्या बैठकीत ठराव क्र. 46.5.07 अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. सदरचा विषय विद्वत परिषद व व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत कार्योत्तर मान्यतेस्तव सादर...<br>**ठराव** – विद्यार्थ्याने केलेल्या विनंती अर्जानुसार तसेच परीक्षा मंडळाच्या बैठकीतील ठरावानुसार सदर विद्यार्थ्यांची आपल्या विद्यापीठाची बी.ए.ची पदवी रद्द करण्यास सर्वानुमते मान्यता दिली. |
| | 63.3.4<br>**सभा व दप्तर कक्ष** | **महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या राज्यमंडळावर डॉ. संजिवनी महाले यांच्या नामनिर्देशनास विद्वत परिषदेच्या कार्योत्तर मान्यतेस्तव सादर....**<br>**टिपणी** - महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या राज्यमंडळावर डॉ. संजिवनी महाले यांच्या नामनिर्देशनास विद्वत परिषदेच्या वतीने मा. कुलगुरू यांनी मान्यता दिलेली आहे. सदरचा विषय कार्योत्तर मान्यतेस्तव विद्वत परिषदेसमोर सादर....<br>**ठराव** – महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या राज्यमंडळावर डॉ. संजीवनी महाले यांच्या विद्वत परिषदेच्या वतीने मा. कुलगुरू महोदयांनी केलेल्या नामनिर्देशनास विद्वत परिषदेच्या वतीने त्यांच्या नामनिर्देशनास सर्वानुमते कार्योत्तर मान्यता देण्यात आली.<br>सदर नामनिर्देशनानिमित्त सर्व सदस्यांनी डॉ. संजीवनी महाले यांचे अभिनंदन केले. |
| | 63.3.5<br>**कृषी विज्ञान विद्याशाखा** | **दि.** 02 **फेब्रुवारी** 2024 **व दि.** 09 **मे** 2024 **रोजी आयोजित कृषी विज्ञान विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्त मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** - दि. 02 फेब्रुवारी 2024 व दि . 09 मे 2024 रोजी आयोजित कृषी विज्ञान विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्त विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर...<br>**ठराव** – सदर विषयाबाबत विद्याशाखेच्या संचालकांनी विद्याशाखा परिषदेच्या महत्त्वाच्या बाबींवर विश्लेषण केले. त्यानुसार विद्याशाखा परिषदेच्या इतिवृत्तास विद्वत परिषदेने सर्वानुमते मान्यता दिली. श्वान पालन प्रमाणपत्र ह्या शिक्षणक्रमाच्या प्रवेशाची किमान पात्रता ही 8 वी उत्तीर्ण अशी असावी. पुर्ननोंदणी मुदत विद्यापीठाच्या प्रचलित पद्धतीप्रमाणे असावी.<br>2 फेब्रुवारी 2024 रोजी झालेल्या कृषी विज्ञान विद्याशाखा परिषदेने मान्यता दिलेल्या अभ्यासकेंद्र निवड पात्रतेच्या निकषांबरोबरच इतर संस्थांना अभ्यासकेंद्र म्हणून मान्यता देताना ते शासनाचे अधिकृत प्राधिकरणाची मान्यता असलेले श्वानपालन केंद्र असावे अशा मान्यताप्राप्त केंद्राला विद्यापीठाचे श्वानपालन अभ्यासकेंद्र म्हणून मान्यता देता येईल. शिक्षणक्रम व प्रात्यक्षिकासाठी मान्यता प्राप्त श्वानपालन केंद्रात प्रशिक्षक असावे. उक्त सुधारणा सुचवून दिनांक 2 फ्रेबुवारी 2024 आणि दिनांक 9 मे 2024 रोजी झालेल्या विद्याशाखा परिषदेतील विषयांना मान्यता देऊन नव्याने सुरू करण्यात येणाऱ्या सर्त शिक्षणक्रमांचे प्रतेश 1 जानेतारी 2025 पासून सुरू करण्यात यातेत असे तरले<br>रादरचा ठराव याच राभेत वाचून याच राभेत कायम करण्यात आला. |

| | | |
|---|---|---|
| | 63.3.6<br>संगणकशास्त्र विद्याशाखा | **संगणकशास्त्र विद्याशाखा यांनी Master of Computer Application (MCA), B.Sc. (Data Science) या दोन शिक्षणक्रमाच्या तयार केलेल्या संरचना, पाठ्यक्रम, प्रोग्रॅम प्रोजेक्ट रिपोर्ट आणि विकसित अध्ययन साहित्य विद्वत परिषदेच्या मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** — संगणक विद्याशाखेने Master of Computer Application (MCA), B.Sc. (Data Science) या दोन शिक्षणक्रमाच्या संरचना, पाठ्यक्रम आणि प्रोग्राम रिपोर्ट तयार करण्यात आला. त्याचबरोबर या दोनही शिक्षणक्रमांचे अध्ययन साहित्य विकसित केले आहे. या दोन्ही शिक्षणक्रमांच्या संरचना, पाठ्यक्रम, प्रोजेक्ट रिपोर्ट व विकसित अध्ययन साहित्य विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर.... |
| | | **ठराव** - संगणक विद्याशाखेने **Master of Computer Application (MCA), B.Sc. (Data Science)** हे दोन शिक्षणक्रमाच्या तयार केलेल्या संरचना, पाठ्यक्रम आणि प्रोग्राम रिपोर्ट तयार करण्यात आला. त्याचबरोबर या दोनही शिक्षणक्रमांचे अध्ययन साहित्य विकसित केले आहे. या दोन्ही शिक्षणक्रमांच्या संरचना, पाठ्यक्रम, प्रोजेक्ट रिपोर्ट व विकसित अध्ययन साहित्याला सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 63.3.7<br>परीक्षा नियंत्रक | **दि. 5.4.2024 रोजी झालेल्या परीक्षा मंडळाच्या ठराव क्र. 49.3.01 अन्वये परीक्षा मंडळाने केलेली शिफारस कार्योत्तर मान्यतेसाठी विद्वत परिषदेसमोर सादर...**<br>**टिपणी** - दि. 5.4.2024 रोजी झालेल्या परीक्षा मंडळाच्या 49 व्या बैठकीत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 अंतर्गत पदव्युत्तर शिक्षणक्रमांच्या परीक्षेबाबत झालेला ठराव क्र. 49.3.01 अन्वये परीक्षा मंडळाने केलेली शिफारस कार्योत्तर मान्यतेसाठी विद्वत परिषदेसमोर सादर... |
| | | **ठराव** — विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित विचारात घेऊन दि. 5.4.2024 रोजी झालेल्या परीक्षा मंडळाच्या ठराव क्र. 49.3.01 अन्वये परीक्षा मंडळाने केलेली शिफारसीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 63.3.8<br>नोंदणी कक्ष | **विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष 2024-25 - प्रमाणपत्र, पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमांचे प्रवेश दि. 1 जून 2024 पासून सुरू करण्याचा प्रस्ताव विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर....**<br>**टिपणी** — विद्यापीठातील विविध शिक्षणक्रमांचे ऑनलाईन प्रवेश एम.के.सी.एल. च्या पोर्टलवरून करण्यात येतात. विद्यापीठात सन 2024-25 या शैक्षणिक वर्षात सुरू करण्यात येणाऱ्या प्रमाणपत्र, पदविका तसेच ज्या पदवी व पदव्युत्तर शिक्षणक्रमांना DEB ची मान्यता आहे. या सर्व शिक्षणक्रमांची प्रवेश प्रक्रिया 1 जून 2024 पासून सुरू करण्याचा प्रस्ताव विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर... |
| | | **ठराव** — प्रत्येक विद्याशाखेत सुरु असलेल्या सर्व शिक्षणक्रमांची यादी अद्ययावत करून तपासून घ्यावी. जे शिक्षणक्रम बंद करण्यात आले आहेत ते विद्यापीठाच्या पोर्टलवरून काढून टाकण्यात यावेत. उक्त कार्यवाही संबंधित विद्याशाखा व विद्यार्थी सेवा विभाग यांनी संयुक्तपणे करावी.<br>ज्या पदवी व पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमांना DEB ची मान्यता आहे त्यांचेसुद्धा प्रवेश दिनांक 1 जून 2024 पासून सुरु करण्यास मान्यता देण्यात आली.<br>सदरचा ठराव याच सभेत वाचून सभेत कायम करण्यात आला. |
| | 63.3.9<br>वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा | **दि. 26 एप्रिल 2024 रोजी आयोजित वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्त मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** - दि. 26 एप्रिल 2024 रोजी आयोजित वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्त विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर... |

| | | |
|---|---|---|
| | | **ठराव** — सदर विषयाबाबत विद्याशाखेच्या संचालकांनी विद्याशाखा परिषदेच्या महत्त्वाच्या बाबींवर विश्लेषण केले. सदर विषय याच सभेत वाचून संमत करण्यात आला. करून त्यानुसार दि. 26-एप्रिल-2024 रोजी झालेल्या वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा परिषदेच्या इतिवृत्तास विद्वत परिषदेने सर्वानुमते मान्यता दिली.<br>सदरचा ठराव याच सभेत वाचून सभेत कायम करण्यात आला. |
| | 63.3.10<br>आरोग्य विज्ञान विद्याशाखा | **दि. 09 मे 2024 रोजी आयोजित आरोग्य विज्ञान विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्त मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** - दि. 09 मे 2024 रोजी आयोजित आरोग्य विज्ञान विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्त विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर... |
| | | **ठराव** — आरोग्य विज्ञान विद्याशाखेमार्फत राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार राबविण्यात येणाऱ्या B.Sc. Lab Techniques, B.Sc. Counseling and Mental Well Being, M.A. Yoga, M.A. Positive Psychology and Well Being तसेच M.Sc. Counseling and Mental Well Being या पदवी तसेच पदव्युत्तर पदवी या नवीन शिक्षणक्रमांना मान्यता देण्यात आली तसेच त्यांचे प्रवेश 1 जूनपासून सरु करण्यास मान्यता देण्यात आली. सदरचा ठराव याच सभेत वाचून सभेत कायम करण्यात आला. |
| | 63.3. 11<br>निरंतर विद्याशाखा | **दि. 22 मे 2024 रोजी आयोजित निरंतर शिक्षण विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्त मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** - दि. 22 मे 2024 रोजी आयोजित निरंतर विद्याशाखा परिषद आयोजित करण्यात आली होती.<br>१. NEP2020 नुसार Event Management Programme संरचना व विषय आराखड्यास मान्यता देण्यात आली<br>२. Certificate in Tailoring, Certificate in Arabic Language, Diploma in salon Techniques, Diploma in Facility Services Advance Diploma in Facility Services हे शिक्षणक्रम बंद करण्यास मान्यता देण्यात आली आहे.<br>सदर बैठकीचे इतिवृत्त विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर... |
| | | **ठराव** — राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार राबविण्यात येणाऱ्या B.B.A. : Event Management Programme या शिक्षणक्रमास तसेच शिक्षणक्रमाचे प्रवेश 1 जूनपासून सुरू करण्यास मान्यता देण्यात आली. परंतु सदर शिक्षणक्रम वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेकडे वर्ग करण्यात यावा असे ठरले. या शिक्षणक्रमाचे ध्येयधोरणे, अध्ययनसाहित्य वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेकडे वर्ग करण्यात यावे असे ठरले.<br>विद्याशाखेमार्फत आतापर्यंत राबविण्यात येणारे परंतु विद्यार्थी संख्येअभावी बंद करण्याचे प्रस्तावित करण्यात येणारे Certificate in Tailoring, Certificate in Arabic Language, Diploma in Salon Techniques, Diploma in Facility Services, Advance Diploma in Facility Services ह्या शिक्षणक्रमांमध्ये शिक्षणक्रमाचा कालावधी, शुल्क यांमध्ये सुधारणा करून सदर शिक्षणक्रम Yashaswi Skills Limited, Pune यांचेमार्फत इतर शिक्षणक्रमांप्रमाणेच सामंजस्य करार करून राबविण्यात यावे असे प्रस्तावित करण्यात आले. |

| | |
|---|---|
| 63.3.12<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखा | **दि. 27 मे 2024 रोजी आयोजित शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्त मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** - दि. 27 मे 2024 रोजी आयोजित शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्त विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर... |
| | **ठराव** — सदर विषयाबाबत विद्याशाखेच्या संचालकांनी विद्याशाखा परिषदेच्या महत्त्वाच्या बाबींवर विश्लेषण केले. दि. 27 मे 2024 रोजी आयोजित शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्त मान्य करण्यात आले.<br>शिक्षणशास्त्र पदवी Bachelor of Education (B.Ed.) शिक्षणक्रमाच्या प्रवेशासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार पंचबिंदू, सप्तबिंदू आणि सध्या दशबिंदूप्रमाणे अतिरिक्त गुण पंचबिंदूप्रमाणे आकारून प्रवेश पात्रता गुणांमध्ये उल्लेख करण्यात यावा. तसेच विद्याशाखेने सादर केलेल्या केलेल्या PPR, PPF, PDF आणि PRF Forms ला मान्यता देण्यात आली.<br>तसेच दि. 13 डिसेंबर 2023 रोजी आयोजित केलेल्या विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्त पटलावर ऐनवेळच्या विषयांत समाविष्ट केले होते. सदर इतिवृत्तास विद्वत परिषदेने सर्वानुमते मान्यता दिली.<br>नियमित पीएच.डी. शिक्षणक्रम विकसित करण्यासाठी तसेच नव्याने सुरु करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) मार्गदर्शक सुचनांनुसार अध्यादेशाचा मसुदा तयार करण्यासाठी चार सदस्यीय समिती गठीत करण्यात यावी. यामध्ये डॉ. संजीवनी महाले - अध्यक्ष, डॉ. सुरेंद्र पाटोळे, नागार्जुन वाडेकर, डॉ. चेतना कामळसकर - सचिव, यांचा समावेश असावा असे ठरले. तसेच शिक्षणशास्त्र विद्याशाखा व मानव्यविद्या विद्याशाखा यांच्या संयुक्त विद्यमाने मानसशास्त्रीय प्रयोगशाळा विकसनाचा विषय वित्त समितीमध्ये मांडण्यात यावा असे सुचविण्यात आले.<br>सदरचा ठराव याच सभेत वाचून याच सभेत कायम करण्यात आला. |
| 63.3.13<br>मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा | **दि. 27 मे 2024 रोजी आयोजित मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्त मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** - दि. 27 मे 2024 रोजी आयोजित मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्त विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर... |
| | **ठराव** — सदर विषयाबाबत विद्याशाखेच्या संचालकांनी विद्याशाखा परिषदेच्या महत्त्वाच्या बाबींवर विश्लेषण केले. नवीन शिक्षणक्रमांची संरचना विषद केली. दि. 27 मे 2024 रोजी आयोजित मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्तास विद्वत परिषदेने सर्वानुमते मान्यता दिली.<br>राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार 2024-25 या शैक्षणिक वर्षापासून 1 जून 2024 पासून सुरू होणाऱ्या नवीन M.A. English, M.A. Mass Communication & Journalism, M.A. Political Science, M.A. Sociology, M.A. Psychology हे पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रम सुरू करण्याचा विषय संमत केला. विद्वत परिषदेने वरील नवीन सर्व शिक्षणक्रमांचे प्रवेश 1 जून 2024 पासून सुरू करण्यास मान्यता देण्यात आली.<br>सदरचा ठराव याच सभेत वाचून याच सभेत कायम करण्यात आला. |
| 63.3.14<br>विज्ञान विद्याशाखा | **दि. 27 मे 2024 रोजी आयोजित विज्ञान विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्त मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** - दि. 27 मे 2024 रोजी आयोजित विज्ञान विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्त विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर... |

| | | |
|---|---|---|
| | | **ठराव** — सदर विषयाबाबत विद्याशाखेच्या संचालकांनी विद्याशाखा परिषदेच्या महत्त्वाच्या बाबींवर विश्लेषण केले. विद्याशाखेमार्फत राबविण्यात येणाऱ्या M.Sc. Mathematics, M.Sc. Chemistry, M.Sc. Zoology, M.Sc. Botany या शिक्षणक्रमांसाठी अध्ययन साहित्य विकसन करून प्रवेशासाठी विद्यार्थी सेवा विभाग, MKCL आणि विद्याशाखा यांची एक बैठक घेऊन विद्यापीठाच्या पोर्टलमध्ये आवश्यक सुधारणा करून घ्याव्यात. Notification काढून प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात यावी. प्रवेश 1 जून 2024 पासून सुरू करण्यास यावे असे सुचविण्यात येऊन दि. 27 मे 2024 रोजीच्या विज्ञान विद्याशाखा परिषदेच्या इतिवृत्तास विद्वत परिषदेने मान्यता दिली. |
| | 63.6.15 **संगणकशास्त्र विद्याशाखा** | संगणकशास्त्र विद्याशाखेमार्फत विद्यार्थ्यांना खालील शिक्षणक्रम उपलब्ध करून देण्याचा विषय विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर....<br>१. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये पदवी शिक्षणक्रम करत असतांना विद्यार्थ्यांना विविध कौशल्ये शिकता यावीत यासाठी ऑनलाइन पद्धतीने डिजिटल स्किल्सचे विविध अभ्यासक्रम (1,2 व 4 श्रेयांकाचे) महाराष्ट्रातील सर्वच विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यासाठी विद्यापीठाने महाराष्ट्र ज्ञान महामंडळाबरोबर करार केला असून त्याअंतर्गत **iLike Courses** विकसित केले आहेत. ते जूनपासून विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यास सादर..<br>२. B.C.A. शिक्षणक्रमाचे प्रवेश यावर्षी प्रवेश परीक्षा घेऊन करण्याचा निर्णय झाला आहे. त्यासाठी विद्यापीठ मान्य दराने प्रश्नपेढी तयार करण्यास सादर...<br>३. इंटरनेटचा वाढता वापर आणि त्यात घडणारे फसवणुकीचे प्रकार पाहता सायबर सिक्युरिटी अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने पदवी आणि पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी 4 श्रेयांकाचे सायबर सिक्युरिटी हा अभ्यासक्रम सर्वच विद्यार्थ्यांनी करावेत अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. त्यासंदर्भात आपल्या विद्यापीठाने स्किल फॅक्टरीबरोबर सामंजस्य करार करून विद्यापीठाने सदर अभ्यासक्रम ऑनलाईन पद्धतीने विद्यार्थ्यांना करता येतील यासाठी अध्ययन साहित्य विकसित केले आहे. विद्यापीठातील सर्वच विद्यार्थ्यांनी पदवी आणि पदव्युत्तर पदवी पूर्ण करण्यापूर्वी हे अभ्यासक्रम पूर्ण करावेत यासाठी किमान शुल्कात हे अभ्यासक्रम जूनपासून उपलब्ध करून देण्याबाबत<br>वरील तीनही विषयाच्या प्रस्ताव विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर... |

| | | |
|---|---|---|
| | | **ठराव** 63.6.15.1 – राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार महाराष्ट्र ज्ञान महामंडळाबरोबर करारानुसार iLike Courses चे प्रवेश जूनपासून सुरू करण्यास मान्यता देण्यात आली.<br>**ठराव** 63.6.15.2 – B.C.A. शिक्षणक्रमासाठी घेण्यात येणाऱ्या प्रवेश परीक्षेसाठी विद्यापीठ मान्य दराने प्रश्नपेढी तयार करून घेण्यास मान्यता देण्यात आली.<br>**ठराव** 63.6.15.3 – सायबर स्पेसमधील धोके आणि त्यापासून आपले संरक्षण कसे करायचे याचे ज्ञान सर्वांना असावे असा उद्देश ठेवून विद्यापीठ अनुदान आयोगाने प्रस्तावित केलेले Cyber Security (UG) आणि Cyber Security (PG) हे 4 श्रेयांकांचे अभ्यासक्रम विद्यापीठातील पदवी आणि पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमाच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात यावेत. याची परीक्षा न घेता विद्यार्थ्याला सदर अभ्यासक्रम किमान अवगत व्हावा हा उद्देश असून Digital India Mission अंतर्गत हा अभ्यासक्रम पूर्ण करणे सर्वांना अनुवार्य असावे. अभ्यासक्रम मराठी आणि इंग्रजी दोन्ही भाषांमधून उपलब्ध करून देण्यात यावा. अभ्यासक्रमाचे शुल्क रू. 500.00 इतके ठेवण्यात यावे. सध्या पदवी आणि पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रम करत असणाऱ्या आणि भविष्यात पदवी आणि पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमास प्रवेश घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना पदवी शिक्षणक्रम पूर्ण करेपर्यंत हा अभ्यासक्रम करावा लागेल. गुणपत्रिकेत ह्या अभ्यासक्रमाचा उल्लेख असेल. प्रमाणपत्र शिक्षणक्रम म्हणून देखील हे शिक्षणक्रम उपलब्ध करून द्यावेत. या विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क रु. 150.00 भरावे लागेल. त्यामुळे शिक्षणक्रमाचे शुल्क रु. 650.00 ठेवावे. यशस्वीपणे शिक्षणक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र द्यावे.<br>वरीलप्रमाणे संगणकशास्त्र विद्याशाखेमार्फत विद्यार्थ्यांना प्रस्तावित शिक्षणक्रम उपलब्ध करून देण्यास विद्वत परिषदेने सर्वानुमते मान्यता दिली.<br>सदरचा ठराव याच सभेत वाचून याच सभेत कायम करण्यात आला. |
| | **63.6.16 वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा** | वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेमार्फत B.A. Facility Services Management, B.B.A. (Accounting & Financial Management) तसेच Ph.D. in Commerce & Management (Regular Mode) हे तीन शिक्षणक्रम 2024-25 या शैक्षणिक वर्षापासून सुरु करण्याबाबत मा. विद्वत परिषदेच्या मान्यतेस्तव सादर...<br>**टिपणी** - शैक्षणिक वर्ष 2024-25 साठी विद्याशाखेमार्फत B.A. Facility Services Management, B.B.A. (Accounting & Financial Management) ह्या शिक्षणक्रमांसाठी UGC-DEB नुसार अध्ययन साहित्य विकसित करण्यात आले आहे. हे शिक्षणक्रम आणि त्यांच्या अध्ययनसाहित्याला तसेच Ph.D. in Commerce & Management (Regular Mode) हा शिक्षणक्रम सुरु करणेविषयीच्या विषयांना विद्वत परिषदेच्या मंजुरीस्तव सादर... |

| | | |
|---|---|---|
| | | **ठराव** - वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेमार्फत B.A. (Facility Services Management), B.B.A. (Accounting & Financial Management), B.B.A. (Event Management) तसेच Ph.D. in Commerce & Management (Regular Mode) हे शिक्षणक्रम 2024-25 या शैक्षणिक वर्षापासून सुरु करण्यास विद्वत परिषदेने सर्वानुमते मान्यता दिली. B.B.A. Event Management शिक्षणक्रम निरंतर शिक्षण विद्याशाखेकडून वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेकडे वर्ग करण्यात आला आहे.<br>Ph.D. in Commerce & Management (Regular Mode) यासाठी अध्यादेशात सुधारणा करण्यात यावी. सुधारित अध्यादेशाचे परिपत्रक काढण्यात यावे. परिपत्रक प्रसिद्ध करण्यात यावे.<br>वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा परिषदेत यशस्वी स्किल्स लिमिटेड, पुणे यांचेशी झालेल्या करारानुसारचे स्कील बेस 8 पदविका शिक्षणक्रमांचा (Diploma in Customer Relationship Management, Dip. In Automotive Dealership Management, Advance Dip. In Administration and Management, Advance Dip. In Cooperative Banking Management, Advance Dip. In Banking Management, Advance Dip. In Retain Banking Management, Advance Dip. In Retail Management, Advance Dip. In Customer Relationship Management) उल्लेख केलेला होता. परंतु विद्याशाखेकडून सदर विषयाचा उल्लेख राहून गेला होता. विद्याशाखा परिषदेमध्ये या पदविका शिक्षणक्रमांना व त्यांच्या प्रवेशांना मान्यता देण्यात आली होती. त्या इतिवृत्ताला मा. कुलगुरूंनी मान्यता दिलेली होती. सबब हे 8 पदविका शिक्षणक्रम Yashaswi Skills Limited, Pune मार्फत राबविण्यास मान्यता देण्यात आली.<br>सदरचा ठराव याच सभेत वाचून याच सभेत कायम करण्यात आला. |
| 63.4.0 | | **मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळचे विषय** |
| | 63.4.1 | नियोजन मंडळ, विद्वत परिषद यांच्या बैठकांचे वर्षभराचे आयोजन करावे. विद्वत परिषदेत नवीन शिक्षणक्रम राबविण्याबाबतच्या मान्यतेपूर्वी सदर विषय नियोजन मंडळात मांडण्यात यावेत. |
| | 63.4.2 | विद्यापीठाच्या संमत कायद्यानुसार विद्वत परिषदेच्या सदस्यांच्या यादीत परीक्षा नियंत्रकांचा समावेश नाही. परंतु परीक्षेचे विषय विद्वत परिषदेत चर्चेसाठी येत असतात. तथापि मा. कुलगुरुंच्या मंजुरीनुसार परीक्षा नियंत्रकांना कायम निमंत्रित सदस्य असे नामनिर्देशन करून सदस्य म्हणून आमंत्रित करण्यात यावे असे ठरले. |
| | 63.4.3 | 19 डिसेंबर 2023 रोजी झालेल्या विद्वत परिषदेत ठराव क्र. 62.3.7 नुसार संगणकशास्त्र विद्याशाखा परिषदेच्या दि. 6 डिसेंबर रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त संमत करण्यात आले.<br>संगणक शास्त्र विद्याशाखा परिषदेच्या बैठकीतील पुढील दोन ठरावांना दिलेली मान्यता सर्वानुमते रद्द करण्यात आली. B-1/F-178/2023/20 M.Sc. (Computer Applications) या दोन वर्ष कालावधीच्या पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमाच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार केलेल्या आणि शिक्षणक्रम सल्लागार समितीने मान्य केलेल्या सुधारीत संरचनेस, त्यातील अभ्यासक्रमांच्या पाठ्यक्रमास आणि त्याच्या अध्ययनसाहित्याच्या विकसनासाठी काम करून शकणाऱ्या तज्ज्ञांच्या यादीस मान्यता देण्यात आली.<br>B-1/F-178/2023/29 B.Sc. (Computer Applications या नावाने पदवी शिक्षणक्रम सुरू करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाची मान्यता घेण्याची प्रक्रिया करण्यास मान्यता देण्यात ~~आली. येथून पुढे सर्व विद्याशाखांनी कोणत्याही कारणाने बंद करण्यात येणाऱ्या शिक्षणक्रमांबाबत~~ विद्याशाखा परिषदेत ठराव करून विद्वत परिषदेकडे पाठवावेत. तसेच ज्या शिक्षणक्रमांना विद्वत परिषदेची मान्यता घेणअयात आली आहे पण ते सुरू करण्यात आले नाही त्या ठरावांची मान्यता रद्द करण्याबाबत विद्वत परिषदेला कळविण्यात यावे. |

| | | |
|---|---|---|
| | 63.4.4 | ज्या शिक्षणक्रमांची प्रवेश संख्या कमी दिसत आहे किंवा मागील तीन शैक्षणिक वर्षांच्या तुलनेत प्रवेश कमी होत असतील अशा शिक्षणक्रमांचे प्रवेश देणे बंद करण्याबाबतच्या विषयावर सखोल चर्चा झाली. यात शिक्षणक्रम बंद करण्यास मान्यता देण्यात आली. त्यासोबतच या शैक्षणिक वर्षात एखाद्या शिक्षणक्रमाला एकूण प्रवेशित विद्यार्थी संख्या 20 पेक्षा कमी असेल तर सदर शिक्षणक्रमाचे प्रवेश सुरु ठेवणे प्रशासकीय व आर्थिक दृष्ट्या योग्य ठरणार नाही. त्यामुळे असे प्रवेश रद्द करावे व 100% शुल्क परतावा करण्यात यावा. असा उल्लेख माहितीपुस्तिकेत करण्यात यावा असे ठरले. |
| | 63.4.5 | शैक्षणिक वर्ष 2024-25 या शैक्षणिक वर्षासाठी सर्व विद्याशाखांच्या माहितीपुस्तिकांना विद्वत परिषदेची मान्यता देण्यात आली. |
| | | सर्व सदस्यांचे आभार मानून बैठक समाप्त करण्यात आली. |

मा.कुलगुरू तथा अध्यक्ष विद्वत परिषद यांच्या परवानगीने बैठक संपन्न झाल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

**सदस्य सचिव**
**विद्वत परिषद**

**अध्यक्ष**
**विद्वत परिषद**